

घंटा वाजली

पैट हचिंस



घंटा वाजली




"मी चहासोबत खाण्यासाठी काही कुकीज बनवल्या आहेत," आई म्हणाली.

"खरंच ," विक्टोरिया आणि सैम म्हणाले . "आम्हाला खूप भुक लागली आहे ."

" आपसात वाटून घ्या ," आई म्हणाली.

"मी भरपूर बनवल्या आहेत ."



"प्रत्येकाला सहा मिळतील ," सैम आणि विक्टोरिया म्हणाले.

"आजीने बनवलेल्या कुकीज सारख्याचं दिसत आहे ," विक्टोरिया म्हणाली.

"ह्यांचा सुगंध देखील आजीने बनवलेल्या कुकीज सारखा आहे ," सैम म्हणाला .

"कोणीचं आजींसारख्या कुकीज बनवु शकतं नाही ," आई म्हणाली.

तेवढ्यात दारावरची घंटा वाजली .



शेजारचे टॉम आणि हॅना आले होते .

"आत या," आई म्हणाली.

"तुम्ही कुकीज शेअर करू शकता."



"प्रत्येकी तीन मिळतील," सैम आणि विक्टोरिया म्हणाले .

"ह्यांचा सुगंध तुमच्या आजीने बनवलेल्या कुकीज सारखाचं आहे ," टॉम म्हणाला .

"आणि तशीच चांगली दिसताय देखील ," हॅना म्हणाली.

"कोणीचं आजींसारख्या कुकीज बनवु शकतं नाही." आई म्हणाली.

तेवढ्यात दारावरची घंटा वाजली .



पीटर आणि त्याचा छोटा भाऊ होता .

"आत या ," आई म्हणाली .

"तुम्ही कुकीज वाटुन घेऊ शकता."



"प्रत्येकाला दोन मिळतील ," सैम आणि विक्टोरिया म्हणाले.

"ह्या तुमच्या आजीने बनवलेल्या कुकीज सारख्याचं

दिसत आहेत." पीटर म्हणाला.
"आणि सुगंध देखील तसाच आहे."

"कोणीचं आजींसारख्या कुकीज बनवु शकतं नाही."
आई म्हणाली.

तेवढ्यात दारावरची घंटा वाजली .



बाहेर जॉय आणि सायमन आले होते .
त्यांच्या चार चुलत भाऊ-बहिणी सोबत .

"आत या ," आई म्हणाली.
"तुम्ही कुकीज वाटुन घेऊ शकता."



"आता प्रत्येकाला एक कुकी मिळेल ," सैम आणि विक्टोरिया म्हणाले .

"ह्यांचा सुगंध तुमच्या आजीने बनवलेल्या कुकीज सारखाचं आहे,"
जॉय म्हणाला.

"आणि तशीच चांगली दिसताय देखील ,"
साइमन म्हणाला .

"कोणीचं आर्जीसारख्या कुकीज बनवु शकतं नाही ,"आई म्हणाली .
तेवढ्यात दारावरची घंटा वाजली .



घंटा परत वाजली .



"अरे बापरे ," आई म्हणाली .
मुलांनी त्यांच्या प्लेट्समधल्या कुकीजकडे पाहिलं .


"कदाचित दरवाजा खोलण्याअगोदर तुम्ही कुकीज संपवल्या पाहिजेत ."
"आम्ही वाट बघतो ," सैम म्हणाला .



बाहेर हातात प्रचंड मोठा कुकीजचा ट्रे घेऊन आजी उभा होती .




"किती छान ! मी बनवलेल्या कुकीज खाण्यासाठी एवढे सगळे मित्र आहेत ," आजी म्हणाली
मी भरपूर कुकीज बनवल्या आहेत .



"आणि कोणीचं आजींसारख्या कुकीज बनवु शकतं नाही," आई म्हणाली.

तेवढ्यात दारावरची घंटा वाजली .



समाप्त